# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
# दूरशिक्षण केंद्र
# शै. वर्ष २०१५—१६

## ♦अभ्यासकेंद्रासाठी नियमावली♦

०१. म्हाविद्यालयाच्या प्राचार्यानी अभ्यासकेंद्रासाठी सेवाजेष्ठ, अनुभवी प्राध्यापकांची समन्वयक म्हणुन नियुक्ती करावी.

०२. महाविद्यालयाचा प्राचार्य हा अभ्यासकेंद्राचा पदसिध्द अभ्यासकेंद्र प्रमुख असेल.

०३. अभ्यासकेंद्राची शैक्षणिक, प्रशासकीय, आर्थिक विषयक उपक्रमासाठी महाविद्यालयातील कनिष्ठ लिपीकाची, सेवकाची नियुक्ती करावी.

०४. अभ्यासकेंद्रासाठी महाविद्यालयातील एखादी छोटीशी खोली उपलब्ध करून द्यावी व त्यावर ''स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड द्वारा संचलीत दूरशिक्षण अभ्यासकेंद्र'' व केंद्रप्रमुख, केंद्रसमन्वयक' यांची नावे टाकावीत.

०५. अभ्यासकेंद्रावर प्रवेशासाठी विद्यापिठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे वृत्तपत्रातून जाहिरात द्यावी, पॉम्प्लेट वाटावेत.

०६. अभ्यासकेंद्राच्या सर्व नियमावलीबाबत, माहिती पत्रकाबाबत माहिती विभागाच्या/ विद्यापिठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

०७. विषयानुरूप प्राध्यापकांची नियुक्ती करून त्यांचेकडून समंत्रणे, चर्चासत्र, प्रात्याक्षिक, सादरीकरण कार्य करवून घ्यावे.

०८. विषयनिहाय समंत्रणाचे वेळापत्रक तयार करून त्यानुसार विद्यार्थ्यांना कळवावे व सुट्टीच्या दिवशी समंत्रणे आयोजित करावीत.

०९. अभ्यासकेंद्राने प्रवेशित विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, विद्यापीठ शुल्क या व्यतिरिक्त रू. ३००/— पदवी प्रती विद्यार्थी व रू. १०००/— पदव्यूत्तर प्रती विद्यार्थी अभ्यासकेंद्र शुल्क प्रवेशाचे वेळी वसूल करावी.

१०. दूरस्थ विद्यार्थ्यांचे सर्व प्रशासकीय, शैक्षणिक व आर्थिक नोंदीचा तपशिल लिपीकाने ठेवावयाचे आहे.

११. अभ्यासकेंद्राने अभ्यासकेंद्र शुल्काचा हिशेब विभागाने पाठवलेल्या अभ्यासकेंद्र शुल्क खर्च विवरणाप्रमाणे ठेवून वर्षाच्या शेवटी सर्व जमा खर्चाचे विवरण संस्थेच्या Auditor करून तेरीज ताळेबंद व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate ) विद्यापिठास सादर करावे.

१२. समंत्रकांनी दूरस्थ विद्यार्थ्यांना ग्रंथालय, अभ्यासक्रम समंत्रणे, गटचर्चा इ. बाबत प्रवेशित विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

१३. प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज, शुल्क, आवश्यक प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती, पात्रतेबाबत माहिती विभागाकडे वर्ग करावी.

१४. संपर्क सत्राचे वेळापत्रक तयार करून त्याची एक प्रत विभागास पाठवावी.

१५. पदव्यूत्तर (एम.ए.) स्तरावरील भाषा व सामाजिक शास्त्रे या विद्याशाखेतील विविध विषयांचे दूरशिक्षण प्रणालीनुसार अभ्यासक्रम विकसन, आरेखन व स्वयंअध्ययन साहित्य निर्मीती प्रक्रिया कार्यान्वित आहे.

१६. प्रवेशित विद्यार्थ्यांना दूरशिक्षण अभ्यासकेंद्र ओळखपत्र वाटप करावे.

१७. अभ्यासकेंद्राच्या नावे राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र खाते असावे व त्याच खात्यातून आर्थिक व्यवहार करावा.

१८. दूरस्थ विद्यार्थ्यांना एकाच वेळी पारंपारीक अभ्यासक्रम व दूरशिक्षण अभ्याक्रमावर आधारीत परीक्षा देवून दोन पदव्या एकाच वर्षात प्राप्त करता येवू शकतात.

१९. एम.ए. (मराठी, हिन्दी, इंग्रजी, संस्कृत, उर्दु, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, तत्वज्ञान, लोकप्रशासन) या विषयांचा दूरशिक्षण प्रणालीवर अभ्यासक्रम तयार करण्याचे काम अपूर्ण राहिल्यामुळे स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती अद्यापहि सुरू झालेली नाही. त्यामुळे शै. वर्ष २०१५—१६ साठी (बी. ए./बी.बी.ए./ बी.कॉम व एम.ए.) या स्तरांवरील अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती व मूल्यमापण पध्द्ती मागील वर्षाप्रमाणेच राहिल याची अभ्यासकेंद्रांनी नोंद घ्यावी.

२०. अभ्यासकेंद्रावरील समंत्रणे घेणारा शिक्षक हा विद्यापीठ मान्य असावा.

२१. संपर्क सत्रातील विद्यार्थ्याचे व प्राध्यापकाचे उपस्थिती पट तयार करून त्यावर त्याची स्वाक्षरी घ्यावी.

२२. नियमित विद्यार्थ्यांप्रामणे दूरस्थ विद्यार्थ्याचे प्रवेश, निर्गम इ. अभिलेखे तयार ठेवावी

२३. प्रशासकीय, शैक्षणिक बाबतीत लवचीकता बाळगावी.

२४. दूरस्थ विद्यार्थी प्रौढ असल्यामुळे त्याच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा विचार व्हावा.

२५. दूरशिक्षण विभागाने तयार केलेली ‘‘ दूरशिक्षण नियमावली व सूचना’’ या संदर्भातील माहिती प्लेक्स बोर्डवर तयार करून ती दूरशिक्षण अभ्यासकेंद्र कार्यालयात लावण्यात यावी.

**संचालक**
**दूरशिक्षण विभाग**
**स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

# दूरशिक्षण केंद्र

# शै. वर्ष २०१५—१६

## ♦ दूरशिक्षण अभ्यासकेंद्र मान्यता निकष ♦

०१. दूरस्थ विद्यार्थी हा प्रौढ, नोकरी, व्यवसायात असणारा, उच्च माध्यमिक तथा पदवी शिक्षण पूर्ण केलेला बहिस्त विद्यार्थी, शिक्षणात खंड पडलेला असल्यामुळे या बाबतीत केंद्रप्रमुखाने शहानीशा करून प्रवेश द्यावा.

०२. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील केवळ विद्यापिठ मान्यताप्राप्त शैक्षणिक महाविद्यालयानीच (Academic Colleges) दूरशिक्षण केंद्र मागणीचा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

०३. दूरशिक्षण अभ्यासकेंद्रासाठी मागणी करणारे महाविद्यालय स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय उपलब्ध करून देणारे असावेत.

०४. सदरील महाविद्यालयात पदवी/ पदव्यूत्तर स्तरावरील कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अभ्यासक्रमांना मान्यता असावी.

०५. दूरशिक्षणाचे मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्राने बी.ए./बी.कॉम./बी.बी.ए./एम.ए. (भाषा/सामाजीकशास्त्रे १० विषय) व आपत्ती व्यवस्थापन प्रमाणपत्र इ. अभ्यासक्रम आपल्या केंद्रावर दूरशिक्षण प्रणालीनुसार राबवावे.

०६. दूरशिक्षण केंद्राच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील विविध विषयांसाठी समुपदेशन, समंत्रण (Councellor) देणारे प्राध्यापक योग्य ती शैक्षणिक अर्हता धारण केलेले, कायमस्वरूपी विद्यापीठ मान्यताप्राप्त अनुभवी प्राध्यापक असावा.

०७. दूरस्थ शिक्षण प्रणालीमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांचे वर्गात फक्त संपर्क सत्रातच संबंध येतो; त्यासाठी समंत्रण देणा—या शिक्षकांनी समंत्रणकला, समुपदेशन या बाबत अधिक सजग असणे आवश्यक आहे. व्याख्यान पध्दतीचा येथे अवलंब करू नये.

०८. काही महाविद्यालयात अभ्यासकेंद्रावर विषय समंत्रण व समुपदेशनासाठी महाविद्यालयातील मान्यताप्राप्त प्राध्यापकांची कमतरता असेल, अशा वेळी केंद्रप्रमुखांनी (प्राचार्य) आपल्या महाविद्यालयातील व त्या परीसरातील योग्य शैक्षणिक अर्हता व अनुभव असणा—या शिक्षकास तसेच तासिका तत्वावर, अस्थाई स्वरूपात काम करणा—या शिक्षकास प्राचार्याच्या मान्यतेने समंत्रक म्हणून नियुक्त केले जावे.

०९. अभ्यासकेंद्र मान्यतेसाठी संबंधित महाविद्यालयाची (इमारत/वास्तू) संस्थेच्या मालकीची असावी. त्यात योग्य त्या भौतिक सुविधा, वर्गखोल्या उपलब्ध असाव्या.

१०. अभ्यासकेंद्र असणा—या महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय असतेच परंतू त्या ग्रंथालयाचा वापर दूरस्थ विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त, सुट्टिच्या दिवशी किंवा

ज्या दिवशी संपर्क तासिका असतील, त्या काळात उपलब्ध करून देण्यात येणे बंधनकारक आहे.

११. विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाचे अभ्यासकेंद्र चालविण्यासाठी स्वतंत कार्यालय असावे, त्यावर अभ्यासकेंद्राची पाटी, लिपीक, सेवक, अभिलेखे यासाठी आलमारी, संगणक अंतरजाल सेवा (Internte) इ. उपलब्ध करून द्यावे.

१२. अभ्यासकेंद्राच्या कार्यालयीन, प्रशासकीय व शैक्षणिक व्यवहार पाहण्यासाठी प्राचार्य (केंद्रप्रमुख) यांनी सेवाजेष्ठ प्राध्यापकाची 'समन्वयक' म्हणून नियुक्ती करावी व सर्व अभ्यासकेंद्राच्या व्यवहाराची जवाबदारी केंद्रप्रमुख, केंद्रसमन्वयक, यांची राहिल.

१३. विद्यापीठाच्या दूरशिक्षण अभ्यासकेंद्राचे नावे स्वतंत्र बॅक खाते उघडलेले असावे व त्यातूनच सर्व जमा खर्चाचे व्यवहार केले जावे.

१४. विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र चालवीत असताना विद्यापीठाचे, दूरशिक्षण विभाग व दूरशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांचे वेळोवेळी जाहिर होणारे नियम सदरील महाविद्यालयामधील अभ्यासकेंद्रास बंधनकारक राहतील.

१५. महाविद्यालयाने अभ्यासकेंद्राच्या जमा खर्चाचा हिशोब विभागाने पूरविलेल्या ''अभ्यासकेंद्र शुल्क विवरण'' तक्त्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

१६. विद्यापिठाची मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्र शुल्क पदवीसाठी प्रतिविद्यार्थी रू. ३००/— व पदव्यूत्तर विभागासाठी प्रतीविद्यार्थी रू. १०००/— याप्रमाणे प्रवेशाचे वेळी केद्रावर विद्यार्थ्याकिडून जमा करून घेणे.पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची केंद्रशुल्काची वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे.

१७. विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येणा—या शुल्काच्या पावत्या विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१८. अभ्यासकेंद्र शुल्क (जमा/खर्च) हिशोब प्रतिवर्षी संस्थेच्या Auditor वरून तपासून घेवून त्याचे तेरीज ताळेबंद व त्याप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) त्या वित्तीय वर्षात विभागाला दाखल करणे बंधनकारक आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना अभ्यासकेंद्र मान्यतेचे उपरोक्त निकष निश्चित करण्यात आले असून सदरील निकष पूर्ण करणा—या महाविद्यालयांनीच नवीन अभ्यासकेंद्र मागणी प्रस्ताव दाखल करावा. सर्वंकष निकष धारण करणा—या व अटी मान्य असणा—या महाविद्यालयांनाच नवीन दूरशिक्षण अभ्यासकेंद्राची मान्यता देण्यात येईल. तत्पूर्वी सदरील महाविद्यालयाची समितीव्दारा संपूर्ण तपासणी करूनच तसा अहवाल मा. कुलगुरूंना सादर केला जाईल.

१९. अभ्यासकेंद्रानी नवीन प्रवेशीत विद्यार्थ्यांना ओळखपत्र PNR नंबरसह उपलब्ध करून दयावे. या ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

२०. अभ्यासकेंद्रानी आर्थिक व्यवहार, परीक्षा, इत्यादी बाबत संपूर्णतः पारदर्शकता बाळगणे वंधनकारक आहे.

**संचालक**
**दूरशिक्षण विभाग**
**स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड**